# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:15.08.2025** **वार:शुक्रवार**

1. एकोणऐंशिव्या स्वातंत्र्यदिनाचा संपूर्ण देशभरात उत्साह. पंतप्रधान नरेंद्र मोदी थोड्याच वेळात लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करणार
2. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं देशाला संबोधन; 2047 पर्यंत विकसित अर्थव्यवस्था होण्याच्या दृष्टीनं भारताची वेगानं वाटचाल सुरू असल्याचा राष्ट्रपतींचा विश्वास
3. स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर 1 हजार 90 जणांना शौर्य आणि सेवा पदकं जाहीर, राज्यातल्या 70 जणांचा समावेश आणि
4. मुंबईत बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातल्या सदनिकांचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरण

**स्वातंत्र्य दिन**

एकोणऐंशिव्या स्वातंत्र्यदिनाचा आज संपूर्ण देशभरात उत्साह आहे. स्वातंत्र्यदिनाचा मुख्य कार्यक्रम नवी दिल्लीत ऐतिहासिक लाल किल्ल्यावर होणार आहे. यावेळी पंतप्रधान लाल किल्ल्यावर राष्ट्रध्वज फडकवतील आणि किल्ल्याच्या तटावरून देशाला संबोधित करतील. स्वातंत्र्यदिनाची यंदाची मध्यवर्ती संकल्पना 'नवा भारत' अशी आहे. यंदा स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमांमध्ये ऑपरेशन सिंदूरच्या यशावर विशेष भर असेल. या कार्यक्रमाचं थेट प्रसारण आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून सकाळी सात वाजल्यापासून होणार आहे. विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या जवळपास पाच हजार नागरिकांना लाल किल्ल्यावर होणाऱ्या कार्यक्रमाचं निमंत्रण देण्यात आलं आहे. राज्यातील सातारा, भंडारा आणि रत्नागिरी जिल्ह्यातील लखपती दीदी आणि बचत गटाच्या प्रमुख अशा 20 महिलाही यात सहभागी होणार आहेत.

**राष्ट्रपती**

2047 पर्यंत विकसित अर्थव्यवस्था होण्याच्या दृष्टीनं भारताची वेगानं वाटचाल सुरू आहे, देशाच्या या अमृत काळात युवावर्ग, महिलाशक्ती आणि दीर्घकाळ मुख्य प्रवाहाच्या बाहेर राहिलेले समाज घटक देशाला आघाडीवर ठेवतील असा विश्वास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केला. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला काल राष्ट्रपतींनी देशवासियांना संबोधित केलं. त्या म्हणाल्या....

**प्यारे देशवासियों, सामाजिक क्षेत्र में किए गए प्रयासों से संवर्धित समग्र आर्थिक विकास के बल पर भारत दो हज़ार सौ चालीस तक एक विकसित अर्थव्यवस्था बनने के मार्ग पर अग्रसर है। मैं समझती हूँ कि अमृतकाल के इस दौर में आगे बढ़ते जाने की राष्ट्रीय यात्रा में सभी देशवासी यथाशक्ति अपना सर्वाधिक योगदान देंगे। मेरा मानना है कि समाज के तीन ऐसे वर्ग है जो हमें प्रगति के इस मार्ग पर आगे बढ़ाएंगे। ये तीनों वर्ग हैं हमारे युवा, महिलाएं और वे समुदाय जो लंबे समय से हसियों पर रहे हैं।**

पहलगाम दहशतवादी हल्ला ही भ्याड आणि अमानवी कृती होती, ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारतीय सशस्त्र दलांनी त्याला अत्यंत निर्णायक पद्धतीने आणि दृढनिश्चयाने प्रत्युत्तर दिलं, दहशतवादाविरुद्ध मानवतेच्या लढाईतलं एक उदाहरण म्हणून ऑपरेशन सिंदूरची इतिहासात नोंद होईल असं राष्ट्रपती म्हणाल्या. ऑपरेशन सिंदूरच्या वेळी देशाची एकता ठळकपणे पुढे आली; आणि आपल्याला विभाजित करू पाहणाऱ्या शक्तींना आपली एकता हेच चोख उत्तर होतं असं त्या म्हणाल्या.

जागतिक पातळीवर अनिश्चिततेचं वातावरण असलं; तरीही भारतानं अत्यंत काळजीपूर्वक केलेल्या सुधारणा आणि आर्थिक नियोजनामुळे भारतीय अर्थव्यवस्था सर्वात वेगानं विकसित होत आहे, असं राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शहरांमध्ये पायाभूत सुविधांची उभारणी, डिजिटल व्यवहारांचा वाढता वेग, यासह समाजातील विविध घटकांसाठी राबवलेल्या कल्याणकारी योजनांचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. स्वदेशी उत्पादनांचा वापर करण्याचं आवाहन त्यांनी देशवासियांना केलं.

शुभांशू शुक्ला यांचा आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकापर्यंतचा प्रवास, बुद्धिबळ तसंच विविध क्रीडा प्रकारांमध्ये भारतीय खेळाडूंनी मिळवलेलं यश युवा पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल असं त्या म्हणाल्या. हवामान बदलाच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी आपल्या सगळ्यांनाच स्वतःमध्ये बदल करावे लागतील असं सांगून पर्यावरण रक्षणासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असं आवाहन राष्ट्रपतींनी केलं.

**ध्वजारोहण**

एकोणऐंशीव्या स्वातंत्र्य दिनाचा राज्यातला मुख्य शासकीय सोहळा आज मुंबईत मंत्रालयात होणार आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. पुण्यात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते, ठाणे इथं जिल्हा मुख्यालयात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते तर बीड इथं उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल.

**बीडीडीचाळ-पुनर्विकास**

मुंबईकरांचं हक्काच्या घराचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी शासन सातत्यानं काम करत आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलं. बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातल्या 556 सदनिकांचं वितरण त्यांच्या हस्ते काल झालं, त्यावेळी ते बोलत होते.....

**आज खरोखर अतिशय आनंदाचा दिवस आहे की तुमच्या सगळ्यांच्या समवेत आम्ही जे स्वप्न बघितलं होतं की बीडीडी चाळीत राहणाऱ्या आमच्या सामान्य मुंबईकराला त्याचं हक्काचं घर द्यायचं आज त्या स्वप्नाची पूर्तता सुरु झालेली आहे. जवळपास 560 लोकांना आपण या ठिकाणी चाव्या देतो आहोत. ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये दुसरी डिलिव्हरी करू, डिसेंबर मध्ये तिसरी डिलिव्हरी करू. आणि एकूण एकट्या वरळीच्या साइट वर मला वाटतं जवळपास नऊ साडे नऊ हजार लोकांना या ठिकाणी आपण घरं देणार आहोत. आणि एकूण चौदा हजार लोकांना आपण ही घरं या ठिकाणी देणार आहोत**.

विकास हे महायुती सरकारचं एकमेव ध्येय असून पुढच्या दीड वर्षांत मुंबई खड्डेमुक्त करू, असं आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं. महायुती सरकारच्या धोरणांमुळे मुंबईकरांच्या जीवनात अमूलाग्र बदल होईल, रखडलेले प्रकल्प पूर्ण होईल आणि झोपडपट्टीमुक्त मुंबईचं स्वप्न साकार होईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी बोलताना दिली.

**अनेक प्रकल्प-मुख्यमंत्री**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि बृहन्मुंबई महापालिकेच्या विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि लोकार्पणही काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. काही वर्षांपूर्वी आपण 'मुंबई विदिन 59 मिनिट्स' हे स्वप्न पाहिलं होतं. हे स्वप्न आता लवकरच पूर्ण होणार आहे असं फडणवीस म्हणाले. मुंबईतील कोस्टल रोड आता नागरिकांसाठी 24 तास खुला असणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**शौर्य पुरस्कार**

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तिन्ही सैन्य दलं आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या जवानांना 127 शौर्य पुरस्कार जाहीर केले; तसंच 290 जणांचा विशेष गौरव केला आहे. यात 4 किर्ती चक्रं, 15 वीर चक्रं, 16 शौर्य चक्रं, 60 सेना पदकं, 6 नौसेना पदकं, 26 वायू सेना पदकं, 7 सर्वोत्तम युद्ध सेवा पदकं, 9 उत्तम युद्ध सेवा पदकं आणि 24 युद्ध सेवा पदकांचा समावेश आहे.

**शौर्यपदक**

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्तानं गृह मंत्रालयाच्या अखत्यारीतल्या विविध सुरक्षा दलांच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना काल उत्कृष्ट सेवेसाठी शौर्य पुरस्कार जाहीर करण्यात आले. पोलीस, अग्निशमन, गृहरक्षक दल या विभागातील एक हजार नव्वद कर्मचाऱ्यांना हे पुरस्कार जाहीर झाले आहेत. महाराष्ट्रातल्या 7 पोलिसांना शौर्य पदक, 3 पोलिसांना उल्लेखनीय सेवेसाठी राष्ट्रपती पदक, तर 39 पोलिसांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदकं जाहीर झाली आहेत. अग्निशमन दलातील आठ, गृहरक्षक दलाच्या 5 तर कारागृह सेवेतल्या 8 जणांचा यात समावेश आहे.

**पुरस्कार**

देशभरातील ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत प्रभागसंघ आत्मनिर्भर संघटन पुरस्कारांचं वितरण काल नवी दिल्लीत झालं. यात महाराष्ट्राच्या 'उमेद' अभियानाने आपला ठसा उमटवला. केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते महाराष्ट्रातील भंडारा जिल्ह्याच्या शिखर प्रभागसंघाला प्रथम पुरस्कार तर रत्नागिरी जिल्ह्याच्या 'हिरकणी प्रभाग संघाला' द्वितीय क्रमांकाच्या पुरस्काराने गौरवण्यात आलं.

**हर घर तिरंगा**

स्वातंत्र्यदिनाच्या अनुषंगानं सर्वत्र घरोघरी तिरंगा अभियान राबवलं जात आहे. राज्याच्या सर्वच जिल्ह्यांमध्ये काल हे अभियान अत्यंत उत्साहात राबवण्यात आलं. धाराशिवमध्ये सायकल फेरी, पुण्यात टपाल विभागातर्फे जनजागृती फेरी, पिंपरी चिंचवडमध्ये देशभक्ती आणि ऐक्याचा संदेश देणारी प्रभात फेरी, तर परभणी, यवतमाळ, सिंधुदुर्ग आणि नाशिक इथं तिरंगा पदयात्रेचं आयोजन करण्यात आलं होतं तर सोलापूरमध्ये तिरंगा दुचाकी फेरी काढण्यात आली. गडचिरोली जिल्हा प्रशासनानं मॅरेथॉन स्पर्धा आणि जनजागृती फेरीचं आयोजन केलं होतं.

**गोकुळाष्टमी**

जन्माष्टमीचा सण आज देशभरात सर्वत्र साजरा होईल; त्यानंतर उद्या राज्यात सर्वत्र दहीहंडी उत्सवाचा थरार पाहायला मिळणार आहे.

**<u>नवरोझ</u>**

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राज्यातील जनतेला पारशी नूतन वर्षानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. नवरोज हा नूतन वर्षाचा पहिला दिवस आहे हा दिवस उत्तम विचार, उत्तम वाणी आणि उत्तम कृती या त्रिसूत्रीचं स्मरण देतो. असं राज्यपालांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**<u>फाळणी वेदना</u>**

स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर देशाची झालेली फाळणी, त्यावेळी झालेल्या भीषण संहारात प्राण गमवावे लागलेल्या हुतात्म्यांची आठवण आणि त्यांच्या दु:खाचं स्मरण म्हणून कालचा 14 ऑगस्ट हा दिवस संपूर्ण देशात फाळणी वेदना स्मृति दिन म्हणून पाळण्यात आला. या अनुषंगाने देशभरात फाळणीच्या आठवणी दाखवणारी  छायाचित्र प्रदर्शनं भरवण्यात आली होती.

**<u>HSRP</u>**

राज्य शासनाने 1 एप्रिल 2019 पूर्वी नोंदणी केलेल्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (HSRP) पाटी लावण्यासाठी यापूर्वी 15 ऑगस्ट पर्यन्त मुदत दिली होती. परंतु वाहन मालकांकडून अल्प प्रतिसाद मिळाल्यानं  आता ही मुदत येत्या 30 नोव्हेंबर पर्यंत वाढवण्यात आली आहे.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात राज्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कोकणात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.